ईश्वरप्राप्तीसाठी कला : रांगोळी - खंड १

## देवतातत्त्वे आणि आनंद आदी स्पंदने आकृष्ट अन् प्रक्षेपित करणाऱ्या

# सात्त्विक रांगोळ्या

## (रांगोळ्यांच्या सात्त्विकतेमागील शास्त्रासह)

मराठी (Marathi)

सात्त्विक रांगोळ्यांविषयी मार्गदर्शक आणि संकलक

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

रांगोळीच्या कलाकृती

कु. संध्या पुंडलिक माळी


कु. कुशावर्ता पुंडलिक माळी

सनातन संस्था

फेब्रुवारी २०२३ पर्यंत सनातनच्या ३६० ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९२ लाख ८१ सहस्र प्रती !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १.३.२०२३ पर्यंत १२२ साधक संत झाले, तर १,०८८ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती


४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**



स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्व ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।।

- जयंत बाळाजी आठवले
१७.५.१९९८

**परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !**

'१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथाच्या मुखपृष्ठावर आणि ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## व्यावहारिक जीवनासह आध्यात्मिक प्रवासही एकत्रितपणे करणाऱ्या सनातनच्या वैशिष्ट्यपूर्ण साधिका-भगिनी कु. संध्या आणि कु. कुशावर्ता माळी !



कु. संध्या पुंडलिक माळी    कु. कुशावर्ता पुंडलिक माळी

या दोघीही वाणिज्य शाखेच्या पदवीधर असून त्यांनी महाराष्ट्र शासनाचा 'कला शिक्षक पदविका' हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. कु. कुशावर्ता या दीड वर्ष खलाणे डी.एड्. महाविद्यालय, चाळीसगाव, जिल्हा जळगाव येथे व्याख्यात्या म्हणून कार्यरत होत्या. दोघींनीही त्यांचा साधनेचा प्रवास ऑक्टोबर २००० पासून 'सनातन संस्थे'च्या मार्गदर्शनानुसार चालू केला. साधनेमुळे ईश्वरी कृपेने त्यांची प्रतिभा जागृत होऊन वर्ष २००६ पासून कु. संध्या यांना, तर एक वर्षानंतर त्यांची ज्येष्ठ भगिनी कु. कुशावर्ता यांना 'कला' या विषयाच्या संदर्भात ज्ञान प्राप्त होऊ लागले. सध्या त्या दोघीही सनातनच्या रामनाथी, गोवा येथील आश्रमात कलेशी संबंधित सेवा करत आहेत.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका


१. प्राचीन हिंदु संस्कृतीचे अविभाज्य अंग असलेली रांगोळी ... ८

२. सात्त्विक कलाकृती (रांगोळी) काढा ! ... ८

  २ अ. रांगोळीच्या आकृतीबंधाला रंगांपेक्षा जास्त महत्त्व असणे ... ८

  २ आ. कलाकृतीची स्पंदने अवलंबून असलेले काही घटक ... ८

    १. आकार    २. दिशा    ३. गतीदर्शकता ... ९

    ४. पूर्णता आणि अपूर्णता    ५. रचना    ६. समतोल ... १५

    ७. कलाकृती कलात्मकतेपेक्षा अर्थबोध होणारी आणि तात्त्विकदृष्ट्या योग्य हवी ! ... १८

३. विविध सण, उत्सव व व्रते यांच्या तिथींना कोणत्या देवतातत्त्वांच्या रांगोळ्या काढाव्यात ? ... १८

४. देवतातत्त्वे आणि विविध स्पंदने यांच्या सात्त्विक रांगोळ्या ... २०

५. रांगोळीचे आध्यात्मिक स्तरावरील महत्त्व सिद्ध करणारे वैज्ञानिक प्रयोग ... ४४

  ५ अ. श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व आकृष्ट करणारे यंत्र, देवीचे चित्र आणि रांगोळी यांचा वायूमंडलावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी 'पी.आय.पी.' तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया'ने केलेली वैज्ञानिक चाचणी ! ... ४४

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ... ५३

# ग्रंथाचे मनोगत

## १. उद्देश

रांगोळ्यांची अनेक पुस्तके उपलब्ध असतांना या विषयावर एक ग्रंथ प्रकाशित करण्याचा उद्देश हा की, ‘सात्त्विक रांगोळी’ असे काहीतरी असते, हे सर्वांना समजावे.

## २. महत्त्व

अ. हिंदु धर्मातील सर्व सण, तसेच विधी कोणत्यातरी देवतेशी संबंधित असतात. त्या त्या सणाच्या दिवशी किंवा विधीच्या वेळी त्या त्या देवतेचे तत्त्व वातावरणात नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात असते किंवा विधीमुळे तेथे आकृष्ट होते. ते तत्त्व आणखी जास्त प्रमाणात यावे व त्याचा सर्वांना लाभ व्हावा; म्हणून ते तत्त्व आकृष्ट तसेच प्रक्षेपित करणाऱ्या रांगोळ्या या ग्रंथात दिल्या आहेत. या रांगोळ्यांमुळे देवतेचे तत्त्व आकृष्ट आणि प्रक्षेपित झाल्याने तेथील वातावरण त्या तत्त्वाने भारित होऊन त्याचा सर्वांना लाभ होण्यास साहाय्य होईल.

आ. या ग्रंथाचा अभ्यास केल्यास इतरांनाही विविध प्रकारच्या सात्त्विक रांगोळ्या काढता येतील. सर्व जण सात्त्विक रांगोळ्या काढू लागले, तर वातावरणातील रज-तमाचे प्रदूषण थोड्या प्रमाणात तात्पुरते तरी अल्प होण्यास साहाय्य होईल.

## ३. वैशिष्ट्ये

अ. प्रत्येक देवतेमुळे शक्ती, भाव, चैतन्य, आनंद आणि शांती या पाचही प्रकारच्या अनुभूती येऊ शकतात. ग्रंथात दिलेल्या रांगोळ्यांत कोणते तत्त्व आहे, हे दिले आहे.

आ. काही रांगोळ्यांत दोन निरनिराळ्या देवतांची तत्त्वेही येऊ शकतात.

इ. श्रीकृष्ण पूर्णावतार असल्याने त्याच्यात सर्वच देवतांची तत्त्वे आहेत; म्हणून काही रांगोळ्यांकडून अन्य देवतांच्या तत्त्वासह श्रीकृष्णाचे तत्त्वही ग्रहण आणि प्रक्षेपित केले जाते.

ई. रांगोळ्यांत जास्तीतजास्त १० टक्के स्पंदने आणि देवतेचे तत्त्व आणता येऊ शकते. रांगोळ्या तयार करणाऱ्या साधकांचा भाव व पातळी वाढत गेली की, हे प्रमाण वाढत जाते.

## ४. रांगोळीची निवड

**४ अ. सण, व्रते आणि उत्सव यांनुसार :** ग्रंथात नेहमीचे सण, व्रते आणि उत्सव कोणत्या

तिथीला येतात आणि त्या वेळी कोणत्या देवतेचे तत्त्व आकृष्ट करणारी रांगोळी काढावी, याची सारणी दिली आहे.

**४ आ. अपेक्षित अनुभूतीच्या स्तरानुसार :** देवतांची तारक आणि मारक अशी दोन रूपे असतात. त्यांच्या मारक रूपापेक्षा तारक रूपाचा आपल्याला जास्त लाभ होतो. तारक रूपात शक्ती, भाव, चैतन्य, आनंद आणि शांती अशा उत्तरोत्तर अनुभूती येतात. आध्यात्मिक पातळी वाढते तशा पुढच्या टप्प्याच्या अनुभूती देणाऱ्या रांगोळ्या आवडतात. ज्यांना सूक्ष्मातील कळत नसेल, त्यांनी शक्तीच्या स्तराच्या रांगोळ्या प्रथम काढाव्यात. साधनेने जसजसे सूक्ष्मातील कळू लागते, तसे पुढच्या पुढच्या टप्प्याच्या रांगोळ्या काढाव्यात. त्या रांगोळ्यांमुळे जास्त जास्त चांगले वाटते. सूक्ष्मातील कळत नसल्याने जरी अनुभूती आली नाही, तरी रांगोळीतील तत्त्वामुळे तिचा लाभ होतोच.

## ५. विविध प्रसंगी उपयुक्त

वाढदिवस, औक्षण इत्यादी प्रसंगी दारात, तसेच ताटाभोवती काढावयाच्या आनंददायी रांगोळ्या कशा असाव्यात, हेही या ग्रंथात दिले आहे.

## ६. व्यावहारिक सूचना

अ. लहान मुलांनी किंवा प्रथमच रांगोळ्या काढणाऱ्यांनी रांगोळ्या काढतांना आवश्यक त्या तत्त्वाची प्रथम सोपी रांगोळी काढावी आणि नंतर थोडी अवघड रांगोळी काढावी.

आ. या ग्रंथातील रंगीत रांगोळ्यांत दिलेले रंग सात्त्विक आहेत. या रंगांमुळे रांगोळीची सात्त्विकता वाढायला साहाय्य होते. रांगोळीची सात्त्विकता वाढली की, देवतेचे तत्त्व आकृष्ट व्हायला साहाय्य होते.

इ. रांगोळी काढणाऱ्याच्या कलात्मकतेला आणि अभ्यासाला वाव देण्यासाठी रंग न दिलेल्या रांगोळ्या ग्रंथात दिल्या आहेत.

## ७. प्रार्थना

'या ग्रंथामुळे केवळ रांगोळ्याच नाहीत, तर सर्वच गोष्टी सात्त्विक होतील, यासाठी सर्वांचे प्रयत्न चालू होवोत', ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक** F (IKRa1) (१ ते ७)